<u>नियमित फौजदारी खटला क्र.१५२/२०२०</u>
<u>निशाणी क्र.२०</u>

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ ची साक्ष

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | :- | सुशिल मोतिलाल बोरसे, |
| वय | :- | ३६ वर्ष, |
| व्यवसाय | :- | व्यवसाय, |
| राहणार | :- | साईनगर, ता.शिंदखेडा, जि. धुळे, |

.........................................................................................................

**<u>सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. सी.पी.चव्हाण यांचे मार्फत.</u>**

दि.११.१२.२०१८ रोजी मी माझ्या दुकानात होतो. त्या दिवशी मी पंचनामा करणेकामी कोठेही गेलो नाही. तसेच मी कोणत्याही कागदावर सही केली नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अ.क्र.१ वर माझे नाव आहे परंतु नावासमोर केलेली सही माझी नाही. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर मला माहिती नाही.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

***सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासास्वरुप प्रश्न विचारण्याची अनुमती मागीतल्याने अनुमती देण्यात आली.***

हे म्हणणे खरे नाही की, दि.१३.११.२०१८ रोजी फिर्यादी व आरोपींचे भांडण झाल्यामुळे मी आरोपींच्या घराजवळ घटनास्थळ पंचनामा करणेकामी उपस्थित होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी फिर्यादीने आरोपींनी त्यास शिवीगाळ व मारहाण केल्याबाबत सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने घटनास्थळी पडलेला दगड आरोपींनी उचलुन फिर्यादीच्या डोक्याच्या पाठीमागे मारुन दुखापत केली अशी

हकिकत आम्हा पंचांसमक्ष सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा केला आणि मी घटनासथळ पंचनामा वाचुन त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखत असल्यामुळे त्यांना वाचवण्यासाठी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**अभियोगपक्षातर्फे उलटतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.एम.डी.सोनवणे यांनी नाकारला. सबब, आरोपींतर्फे उलटतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/--
(विनिता आ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) शिंदखेडा

दिनांकः- ०९/०३/२०२६

-: प्रमाणपत्र :-

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकुराशी शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :- | सचिन अरुण परदेशी |
| न्यायालयाचे नाव | :- | सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,<br>शिंदखेडा, जि. धुळे. |

आदेश अपलोड केलेचा दिनांक :- ०९/०३/२०२६

सही/---
लघुलेखक, श्रेणी-३
सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा